DAY — **09** SEAT NUMBER

| 2025 | VII | 04 |
|---|---|---|

1100

# J-397

(M)

# ORGANISATION OF COMMERCE AND MANAGEMENT (51)

**Time : 3 Hrs.** **(7 Pages)** **Max. Marks : 80**

***सूचना :*** *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

*(२) उजव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.*

*(३) डाव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.*

*(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराची सुरुवात नवीन पानावर करावी.*

**प्र.१.** **(अ)** रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) नाशवंत वस्तू ———— गोदामात साठविल्या जातात.

(अ) करदेय

(ब) शीतगृह

(क) सरकारी

(२) ज्या प्रक्रियेत व्यावसायिक कामे करण्याचा करार दुसऱ्याला दिला जातो, त्या प्रक्रियेस ———— असे म्हणतात.

(अ) बाह्यसेवा

(ब) व्यापार

(क) ई-व्यवसाय

(३) 'नीतिशास्त्र' ही संकल्पना ———— शब्दापासून घेतली आहे.

(अ) लॅटीन

(ब) फ्रेंच

(क) ग्रीक

(४) ———— हिताचे संरक्षण करणे हा ग्राहक संघटनांचा मुख्य उद्देश असतो.

(अ) ग्राहकांच्या

(ब) व्यापाऱ्यांच्या

(क) उत्पादकांच्या

(५) व्यवस्थापनाची कार्ये ———— या कार्याने सुरू होतात.

(अ) संघटन

(ब) नियोजन

(क) समन्वय

**(ब)** योग्य शब्द, शब्दसमूह, संज्ञा लिहा : (५)

(१) एक अशी प्रक्रिया जी कर्मचाऱ्यांना संस्थात्मक उद्दिष्टे साध्य करण्यावर भर देते.

(२) एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे कल्पना, वस्तुस्थिती, माहिती, इत्यादींचे देवाण घेवाण करण्याची कला.

(३) इंटरनेटच्या मदतीने केले जाणारे व्यवहार.

(४) आरोग्य आणि जीवितास संरक्षण व सुरक्षिततेच्या संबंधीचा ग्राहकाचा अधिकार / हक्क.

(५) एखाद्या उत्पादनाला विशिष्ट नाव देणे.

**(क)** खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते लिहा : (५)

(१) व्यवसाय नीतिशास्त्र ही नियमावली आहे.

(२) संघटनात्मक कार्य सुरळीत होण्यासाठी सहकार्याची आवश्यकता नसते.

(३) हवाई वाहतूक हे सर्वांत स्वस्त वाहतुकीचे साधन आहे.

(४) भारतात ग्राहक संरक्षण कायद्याची आवश्यकता नाही.

(५) विपणी हा शब्द लॅटिन भाषेतील 'मार्केट्स' शब्दापासून आलेला आहे.

**(ड)** गटात न बसणारा शब्द शोधा : (५)

(१) अधिकार व जबाबदारीचे तत्त्व, हालचालींचा अभ्यास, कामाच्या विभागणीचे तत्त्व, शिस्तीचे तत्त्व.

(२) प्राथमिक सहकारी पत संस्था, राज्य सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँक, विनिमय बँक.

(३) डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, आधार कार्ड, ए.टी.एम. कार्ड

(४) नोकरीची सुरक्षितता, आरोग्य व सुरक्षिततेची साधने, कामाची सुयोग्य स्थिती, योग्य प्रमाणात नफा.

(५) भाग बाजार, परकीय चलन, सोने चांदी बाजार, उत्पादित वस्तूंचा बाजार.

**प्र.२. खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा ( कोणत्याही चार ) :** [ ८ ]

(१) वेळ अभ्यास

(२) कर्मचारी व्यवस्थापन

(३) गोदाम

(४) निर्देशन

(५) लोक अदालत

(६) वाहतूक

**प्र.३. खालील घटना किंवा परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा ( कोणतेही दोन ) :** [ ६ ]

(१) श्री. अनिल हे व्यावसायिक आहेत. त्यांचे पुणे आणि नाशिक येथे कारखाने आहेत. श्री. अनिल हे कुटुंबासह पुण्यामध्ये स्थायिक असून त्यांना ५ आणि ८ वर्षे वयाच्या दोन मुली आहेत.

(अ) श्री. अनिल हे त्यांच्या पत्नी व दोन मुलींसाठी जीवन विमा घेऊ शकतात का?

(ब) श्री. अनिल त्यांच्या कारखान्यासाठी सागरी विमा घेऊ शकतात का?

(क) आगीमुळे कारखान्याच्या होणाऱ्या नुकसानीच्या भरपाईसाठी कोणत्या प्रकारचा विमा श्री. अनिल घेऊ शकतात?

(२) श्री. सागरने टायटनच्या दुकानातून घड्याळ खरेदी केले आणि त्याची मैत्रीण अंजलीने ऑनलाईन पद्धतीने घड्याळ खरेदी केले.

(अ) कोणी पारंपरिक मार्गाने / पद्धतीने खरेदी केली?

(ब) कोणी ऑनलाईन मार्गाने / पद्धतीने खरेदी केली?

(क) कोणत्या पद्धतीमध्ये जास्त जोखीम आहे?

(३) बळवंत कंपनी लिमिटेड आपल्या महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या लहान बालकांसाठी पाळणाघर व घरात थांबूनच काम करण्याची सवलत देते. जरी ते कामगार संघटनेचे सभासद असले तरी व्यवस्थापन निर्णय घेण्यापूर्वी त्यांच्या सूचनांची दखल घेते.

(अ) ही कृती करत असताना ते कोणत्या घटकांविषयी सामाजिक जबाबदारी पार पाडतात?

(ब) कंपनीकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली कोणतीही एक सुविधा लिहा.

(क) वरील घटनेमध्ये मालक, कोणत्या प्रकारच्या जबाबदारीचे अनुसरण करतात?

**प्र.४. खालील फरक स्पष्ट करा ( कोणतेही <u>तीन</u> ) :** **[ १२ ]**

(१) नियोजन आणि संघटन

(२) जीवन विमा आणि अग्नी विमा

(३) ई-व्यवसाय आणि ई-वाणिज्य

(४) जिल्हा आयोग आणि राज्य आयोग.

**प्र.५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा ( कोणतेही दोन ) : [ ८ ]**

(१) ग्राहक संरक्षणाच्या कोणत्याही चार गरजा स्पष्ट करा.

(२) विपणीचे क्षेत्रानुसार व व्यवहाराच्या आकारानुसार प्रकार स्पष्ट करा.

(३) गोदामाची कोणतीही चार कार्ये स्पष्ट करा.

**प्र.६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा ( कोणतेही दोन ) : [ ८ ]**

(१) व्यवस्थापनाची तत्त्वे लवचीक स्वरूपाची असतात.

(२) नियंत्रण हे व्यवस्थापनाचे अंतिम कार्य आहे.

(३) सामाजिक विकासामध्ये, व्यवसाय नीतिशास्त्र हे एक महत्त्वाचे तंत्र मानले जाते.

(४) ग्राहकांवर अनेक जबाबदाऱ्या आहेत.

**प्र.७. खालील प्रश्न सोडवा ( कोणतेही दोन ) : [ १० ]**

(१) हेन्री फेयॉल यांची व्यवस्थापनाची कोणतीही पाच तत्त्वे स्पष्ट करा.

(२) उद्योजकाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(३) विपणनाचे समाजासाठी असणारे महत्त्व स्पष्ट करा.

**प्र.८. खालील प्रश्नाची उत्तरे लिहा ( कोणताही एक ) :** **[ ८ ]**

(१) विपणनाचा अर्थ सांगून विपणन मिश्रणाचे सात पी (7 Ps) स्पष्ट करा.

(२) बँकेचा अर्थ स्पष्ट करून बँकांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

◆◆◆